आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक २० ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर; विदर्भातील ६२ जागांपैकी २३ जागी भाजपचे उमेदवार जाहीर.
- निवडणूक कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा नागपूर जिल्हाधिकाऱ्यांचा ईशारा.
- दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी मध्य रेल्वे करणार ५७० विशेष फेऱ्या; एसटी महामंडळाच्या वतीनं देखील अतिरिक्त बसेसचे नियोजन.
- हवामान खात्याकडून संपूर्ण विदर्भासाठी आज आणि उद्या येल्लो अलर्ट जारी; उद्या बुलढाण्यात मुसळधार पावसाचा इशारा.

भाजपची पहिली यादी

भारतीय जनता पक्षाने आज महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ९९ उमेदवारांची पहिली यादी जारी केली आहे. या उमेदवार यादीत एकूण १३ महिला उमेदवारांचा समावेश आहे. नागपूर जिल्ह्यात दक्षिण पश्चिम मतदारसंघातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषद नेते चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.....

*भाजपच्या केंद्रीय निवड समितीने आज 99 उमेदवारांची पहिली यादी जारी केली. त्यात विदर्भातील 23 मतदारसंघांचा समावेश आहे. विदर्भात एकूण 62 मतदार संघ आहेत. आज जारी केलेल्या यादीत नागपूर दक्षिण पश्चिम मधून राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. तर कामठीवरून विधान परिषदेचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय हिंगणा मतदारसंघातून समीर मेघे, नागपूर दक्षिणमधून मोहन मते, नागपूर पूर्व इथून कृष्णा खोपडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. 2014 च्या तुलनेत 2019 मध्ये भाजपला विदर्भात कमी जागा मिळाल्या होत्या. या निवडणुकीत भाजप आपल्या पूर्ण ताकदीनिशी प्रत्येक मतदारसंघात विजयी होण्यासाठी प्रयत्न करत आहे.*

याशिवाय अकोला पूर्व मतदार संघातून रणधीर सावरकर, चिखलीतून -श्वेता महाले, खामगावमधून- आकाश फुंडकर, धामणगाव रेल्वे इथून प्रताप अडसड, अचलपूर मधून प्रवीण तायडे, देवळी इथून राजेश बकाणे, हिंगणघाट मधून समीर कुणावार, वर्धेतुन पंकज भोयर, यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गोंदियातुन- विनोद अग्रवाल, आमगावमधून -संजय पुरम, आरमोरी येथून- कृष्णा गजबे, बल्लारपूर मधून मंत्री सुधीर मुनगंटीवार, चिमूर येथून - बंटी भांगडिया, वणी इथून- संजीव रेड्डी बोडकुरवार, तर राळेगावमधून- डॉ.अशोक उईके आणि यवतमाळ मतदारसंघातून मदन येरावार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजप केंद्रीय समितीची बैठक जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेत नुकतीच पार पडली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृह मंत्री अमित शाह आणि केंद्रीय निवड समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

सी-व्हिजिल

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४साठी १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते १९ ऑक्टोबरपर्यंत, राज्यभरात सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲपवर एकूण ५७६ तक्रारी प्राप्त झाल्या असून ,त्यापैकी ५६३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या असल्याची माहिती, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली. राज्यात आचारसंहितेची अंमल बजावणी अत्यंत काटेकोरपणे सुरु झाल्याचं नमूद करत ,जाहिरातींवर केलेल्या कारवाईबद्दल कुलकर्णी म्हणाले-

***एमसीसी च्या ७२ तासामध्ये आपल्याला जी कारवाई करायची असते त्या कारवाई अंतर्गत शासकीय जागेतले दोन लाख ४२ हजार ६३४ एवढ्या जाहिराती या हटवण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक जागेतल्या पूर्ण राज्यभरातून दोन लाख एकोणऐंशी हजार एवढ्या जाहिराती हटवण्यात आलेल्या आहेत. आणि खासगी जागेमध्ये बिनापरवानगी असलेल्या एक लाख ८३ हजार जाहिराती हटवण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त काही ठिकाणी जर अजूनही बिनापरवानगी जाहिराती आढळून आल्या तर त्याबद्दल ची तक्रार नागरिकांना सी-व्हिजिल अप वरती करता येईल. राज्यामध्ये आचारसंहितेची अंमलबजावणी अतिशय व्यवस्थितरित्या सुरु झालेली आहे हे मी नमूद करू इच्छितो.***

## डॉ.विपिन इटनकर

निवडणूक विभागातर्फे सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी ही राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. याच बरोबर कोणताही शासकीय कर्मचारी हा राजकीय प्रचारात सहभागी होता कामा नये. याबाबत निवडणूक विभागामार्फत स्वयंस्पष्ट आदेश निर्गमित केले आहेत. आपली जबाबदारी टाळण्यासाठी कोणीही आदेश रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास नियमानुसार कारवाई अटळ असल्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर यांनी दिला. काल एका मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षकयांच्यावर अधिकृत कर्तव्याचे पालन न केल्यामुळे लेखी तक्रार दाखल झाली. या तक्रारीअन्वये सावनेर येथील पोलीस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संशयास्पद अर्ज

चंद्रपूर जिल्हयातील  राजुरा विधानसभा मतदार संघात, अज्ञात व्यक्तिंकडून ऑनलाईन पध्दतीने मोठ्या प्रमाणात अर्ज केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.  प्रशासनाने याबाबत तात्काळ पाऊल उचलत संशयास्पद असलेले 6861 अर्ज पडताळणी करून नाकारले आहेत. दरम्यान जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी या प्रकरणी पोलिस प्रशासनाला तपासणीचे आदेश दिले आहेत.

## आढावा विधानसभा मतदारसंघांचा

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्हयातल्या ८ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

## डॉक्टर सिद्धार्थ देवळे

वंचित बहुजन आघाडीचे पश्चिम विदर्भाचे माजी अध्यक्ष डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. दुपारी मातोश्री मध्ये उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. डॉ. सिद्धार्थ देवळे हे वाशिम जिल्हयात १५ वर्षापासून वैद्यकीय व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांनी 2019

ची वाशिम विधानसभा मतदारसंघाची निवडणूक वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर लढली होती आणि 52 हजार मत घेऊन ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले होते.

विशेष रेल्वे

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेनं ५७० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १३२ फेऱ्या मुंबईहून, तर १४६ फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर १०८ फेऱ्या लातूर, सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. अधिक माहिती आणि सविस्तर वेळापत्रक प्रवासी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळावर तसंच किंवा NTES अप्रवर उपलब्ध आहे.

अतिरिक्त बस

दिवाळीच्या सुट्टीचा आनंद एसटी प्रवाश्यांना घेता यावा याकरीता पुणे येथून अमरावतीकडे येणाऱ्या प्रवाश्यांच्या सुविधेकरीता अतिरिक्त बसेसचे नियोजन एसटी महामंडळाच्या वतीनं करण्यात आलं आहे. पुणे येथून येण्याकरीता २७ ते ३१ ऑक्टोबर आणि अमरावतीयेथून जाण्याकरीता ३ ते १० नोव्हेंबर दरम्यान ५० अतिरिक्त बसेस म्हणजेच १०० फेऱ्या होणार आहे. या व्यतिरिक्त यवतमाळ, अकोला, वर्धा, चंद्रपुर, वाशिम आदी ठिकाणी देखील प्रवाश्यांची संख्या पाहून अतिरिक्त बसेस सोडल्या जाणार आहे. याकरीता ऑनलाईन आरक्षणाची सुविधा उपलब्ध करण्यात आली असुन आतापर्यंत २१ बसेसचे पुणे येथुन अमरावतीकरीता बुकींग करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाश्यांनी ऑनलाईन आरक्षण करण्याचं आवाहन विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांनी केलं आहे.

हवामान

राज्यात परतीच्या पावसानं जोर धरला असून, अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान झालं आहे. अमरावती जिल्ह्यात कालपासून झालेल्या पावसामुळे शेतात असलेल्या सोयाबिनला फटका बसला आहे. काही शेतकऱ्यांनी सोयाबीन घरी आणलं असलं, तरी शेतात पडून असलेलं सोयाबीन खराब होण्याची भीती आहे. काही ठिकाणी तुरीला

आलेल्या फुलोऱ्याला मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यात, काल झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचलं असून, कापून ठेवलेल्या धान पिकाचं नुकसान झालं आहे. दिवाळीच्या तोंडावर अस्मानी संकटामुळे शेतकरी हतबल झाला असून, कृषी विभागाने पंचनामा करून तात्काळ मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, विदर्भातील सर्व जिल्ह्यांसाठी आज आणि उद्या येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, उद्या बुलढाणा जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विजांच्या कडकडाटांसह वादळ येण्याची देखील शक्यता आहे. आगामी काही तासांत गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो.

'वॉक फॉर फ्रीडम'

आधुनिक काळातील गुलामगिरीविरुद्धच्या जागतिक कार्यक्रमाचा भाग म्हणून, ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी आणि नागरिकांनी जागतिक 'वॉक फॉर फ्रीडम' च्या भंडारा रॅलीत सहभाग घेतला. शिवाजी स्टेडियम इथं बिजू गवारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. 'जागरूक राहून मानवी तस्करी थांबविण्याचा प्रयत्न करण्याची' शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. 'वॉक फॉर फ्रीडम' हा मानवी तस्करी संपवण्यासाठी जागतिक समन्वित प्रयत्न आहे, जो दीडशे पेक्षा अधिक देशांत आयोजित केला जातो. आधुनिक काळातील गुलामगिरीविरुद्धच्या जागतिक कार्यक्रमाचा भाग म्हणून, चंद्रपूर शहर देखील या उपक्रमात सामील झालं आहे.